पोआ/११(६)/१६३/ए.पी.एल./(०६)/२०२४

**पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई**

**आदेश**

**भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ च्या कलम १६३ अंतर्गत**

१. ज्याअर्थी, पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्या अखत्यारीतील भागात फुगे, उंच उडणारे फटाके, प्रकाश उत्सर्जित करणारी वस्तू, पतंग इत्यादी हवाई क्षेत्रात व आसपास उडवले जात असल्याची माहिती प्राप्त झाली आहे. तसेच छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ, जुहू एरोड्रोम, नौदल हवाई स्टेशन INS शिक्राच्या आसपासच्या मुक्त उड्डाण क्षेत्रात, लँडिंग विमानाच्या दिशेने व धावपट्ट्यांना दृष्टीकोन मार्ग, लेझर लाईट बीम्स चमकवण्यात येतात ज्यामुळे उक्त क्षेत्रामध्ये विमानांचे सुरक्षित आवागमन धोक्यात येते

२. त्याअर्थी, जेथे सुरक्षित आणि लेझर बीम मुक्त उड्डाण क्षेत्र स्थापन करण्यासाठी पॅराग्लायडर्सचे उड्डाण, फुगे पाठवणे, हाय राइजर फटाके, प्रकाश उत्सर्जित करणाऱ्या वस्तूंचा वापर, पतंग उडवणे आणि लेझर बीम प्रदीपन वापरणे यावर प्रतिबंध करणे आवश्यक आहे. छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या आजूबाजूला पॅराग्लायडर्स, फुगे, उंच उडणारे फटाके, प्रकाश उत्सर्जित करणाऱ्या वस्तू,पतंग यांच्या वापरास प्रतिबंध करता येईल जेणेकरून लेझर बीमचा विमानाच्या लँडिंग, टेक ऑफ आणि सुरक्षित विमान उड्डाण आवागमनावर परिणाम होऊ नये आणि त्यासाठी त्वरीत कारवाई करणे आवश्यक आहे;

३. आता, म्हणून मी, **अकबर पठाण, पोलीस उप आयुक्त (अभियान), बृहन्मुंबई** तथा कार्यकारी दंडाधिकारी, बृहन्मुंबई, कलम १६३, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ सह कलम १०(२), महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ याव्दारे आदेश देतो की, बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या कार्यकक्षेत:

अ) कोणत्याही व्यक्तीने छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या आजूबाजूच्या फ्री फ्लाइट झोनमध्ये उंच उडणारे फटाके उडवणे, प्रकाश उत्सर्जित करणाऱ्या वस्तू सोडणे, पतंग उडवणे आणि लेझर बीम प्रकाशित करणे, फुगे, पॅराग्लायडर्स उडवू नयेत.

ब) कोणत्याही विमानाच्या लँडिंग, टेक ऑफ आणि आवागमनामध्ये अडथळा आणण्याच्या उद्देशाने अशा प्रकारच्या क्रियाकलापांचा वापर केल्याचे लक्षात येताच कोणतीही व्यक्ती जवळच्या पोलीस ठाणेस माहिती देईल.

४. **हा आदेश दि. २९/११/२०२४ रोजीचे ००.०१ पासून दि. २७/०१/२०२५** रोजीचे २४.०० वाजेपर्यंत **पूर्वी मागे घेतल्याशिवाय (दोन्ही दिवसांसह)** ६० दिवसांच्या कालावधीसाठी प्रभावी असेल.

५. **या आदेशाचे उल्लंघन करणारी कोणतीही** व्यक्ती भारतीय न्याय संहिता, २०२३ च्या कलम २२३ अंतर्गत **दंडनीय असेल.**

७. **सर्व संबंधितांना वैयक्तिकरित्या नोटीस बजावली जाऊ शकत नसल्यामुळे, याद्वारे आदेश एकतर्फी पारित करण्यात आला आहे. लोकांच्या माहितीसाठी सर्व पोलीस ठाणे, सर्व स.पो.आ., सर्व पो.उ.आ., महानगरपालिका प्रभाग कार्यालयांच्या सूचना फलकांवर आणि तहसील आणि प्रभाग कार्यालयात प्रती चिकटवून व प्रसार माध्यमांद्वारे ते प्रसिध्द केले जातील.**

सदरचा आदेश माझ्या सही शिक्यानिशी आज दिनांक २६ नोव्हेंबर, 2024 रोजी दिला आहे.

Deputy Commissioner of Police (Operations) Bihan Mumbai

( अकबर पठाण )
पोलीस उप आयुक्त, (अभियान),
तथा कर्यकारी दंडाधिकारी
बृहन्मुंबई

पोलीस आयुक्त,
बृहन्मुंबई यांचे कार्यालय

Scanned with CamScanner